# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - १८८२/२०२१/नाशिक**

१ श्री.आण्णा किसनराव मोरे, : अपिलार्थी
रा.सरकारी दवाखान्यासमोर,
मु.पो.खडावली (पू),
ता.कल्याण, जि.ठाणे-४२१३०१.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
प्रथम लिपीक,
सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, ग्रीन बिल्डींग,
उंटवाडी रोड, नाशिक, ता.जि.नाशिक

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, : प्रतिवादी
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, ग्रीन बिल्डींग,
उंटवाडी रोड, नाशिक, ता.जि.नाशिक

**सुनावणी दिनांक – १३/०४/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक १८/०७/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक १३/०४/२०२२ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी (सेवानिवृत्त) अनुपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. वास्तविक सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"माहिती उपलब्ध करुन देण्यानुषंगाने संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल."

शासनाच्या अशा स्पष्ट सूचना असतानादेखील तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १०/०२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी जाणुन बुजून माहिती दिली नाही. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल करावे लागले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १०/०२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २०१९-२०२० या कालावधीतील पुढील उपविभागातील टेंडरची अदा झालेल्या देयकाची कॉपी, डांबरपावत्या, डांबर कन्झमशन एम.बी.झेरॉक्स याबाबतची माहिती मागितली होती. १) उपविभाग त्र्यंबकेश्वर-४५,५०,५४,५७,५८,६३,६९,७०,७१, ८७,८८,९५,१०९ व १३४. २) उप विभाग दिंडोरी-४६,४७,४८,६२,६५,८५,८६,९३, ९९,१०१ व ११० ३) उप विभाग सुरगाणा-४९,५९,७३,७९,८९,९६,१०० व १०४ ४) उप विभाग पेठ-५१,६१,६४,६८,९८ व १०२. त्यास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज दिनांक १८/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, सा.बां.उपविभाग क्र.१/२, दिंडोरी, सा.बां.उपविभाग क्र.१/२, त्र्यंबकेश्वर, सा.बां.उपविभाग पेठ, सा.बां.उपविभाग क्र.१/२ सुरगाणा, कृषी बांधकाम उपविभाग क्र.२ नाशिक यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (३) अन्वये वर्ग करुन अपिलार्थीस अवगत केले. त्यानंतर दिनांक १२/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले की, अर्जात आपण एकापेक्षा जास्त कार्यालयाशी संबंधित व एकापेक्षा जास्त विषयासंदर्भात माहिती मागविलेली आहे. सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.केमाअ-२००८/प्र.क्र.९३/०८/सहा/ दि.०६/०९/२००८ अन्वये एकापेक्षा जास्त प्राधिकरणाशी संदर्भात माहिती आवश्यक असल्यास अर्ज हस्तांतरीत करणे आवश्यक नाही. प्रत्येक प्राधिकरणाकडे वेगळे अर्ज करावेत. मागविलेली माहिती ही व्यापक, विस्तृत स्वरुपाची व मोठी असल्याने जास्त मनुष्यबळाची आवश्यक आहे. सध्या पुरेसे मनुष्यबळ या कार्यालयात उपलब्ध नाही. व इतक्या मोठया प्रमाणात देयकाच्या छायांकित प्रती देणेसाठी निधीची उपलब्धता नाही. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक ३०/०३/२०२१ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक ३०/०३/२०२१ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८/०४/२०२१ रोजी निर्णय पारीत करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विविध प्राधिकरणाशी संबंधीत असल्याने त्यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करण्याबाबत दिनांक १२/०३/२०२१ च्या पत्रान्वये अपिलार्थीस कळवून योग्यते मार्गदर्शन केले असल्याचे व आपली कर्तव्य व जबाबदारी अधिनियमातील तरतुदीनुसार बजावली असल्याचे स्पष्ट होत असल्याने माहितीचा देण्याचा त्यांचा कल दिसुन येतो, असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १०/०२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती

अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक १८/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांचा माहिती अर्ज माहितीशी संबंधित विविध कार्यालयांना वर्ग करुन अपिलार्थीस अवगत केले. त्यानंतर दिनांक १२/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मागितलेली माहिती विविध प्राधिकरणाशी संबंधीत असल्याने त्यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करण्याबाबत कळविले आहे. तथापि, अपिलार्थीस माहिती अप्राप्त असल्याने आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेल्या माहितीपैकी एका उपविभागाशी संबंधित माहिती सशुल्क पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपीक, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, ग्रीन बिल्डींग, उंटवाडी रोड, नाशिक, ता.जि.नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०/०२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने एका उपविभागाची माहिती सशुल्क नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी.

२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, नाशिक यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

३) वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १८८२/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, ग्रीन बिल्डींग, उंटवाडी रोड, नाशिक.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

---

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र.१८८२/२०२१/नाशिक/ ओ-१७४० दिनांक- 20/08/2022